ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# "इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी संभाषण कौशल्याच्या विकसनासाठी एक प्रयोग"

**श्रीम. शर्मिला सुभाष लाड**
*उपशिक्षिका जिल्हा परिषद प्राथ. शाळा, म्हावशी.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना**

हजर नाही ! 'WEL-COME' या माझ्या नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या इंग्रजी शब्दसंपत्तीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. वर्गातील सर्व विद्यार्थी Dictionary वापरू लागले. त्यांच्यामध्ये Listening, Reading, Writing ही कौशल्ये वृद्धिंगत झाली. या कौशल्यांबरोबरच Speaking हे कौशल्यही आत्मसात होणे गरजेचे आहे, हे लक्षात आल्यामुळे संशोधकास या समस्येचा विचार करणे भाग पडले.

**गरज आणि महत्व**

Speaking in English मुळे विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयाबद्दलची भीती नाहिशी होईल. इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे असलेले आकर्षण कमी होण्यासाठी संशोधकाला या समस्येचा अभ्यास करण्याची गरज वाटली.

विद्यार्थ्यांचे इंग्रजी भाषेतील संभाषण कौशल्य जर चांगले असेल तर विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात वाढ होणार आहे. त्यांच्यामध्ये सभाधीटपणामध्ये वाढ होण्यासाठी संशोधकाने ही समस्या निवडली आहे.

**उद्दिष्टे**

१. इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांची संभाषण कौशल्याबाबत सदय:स्थिती अभ्यासणे व येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
२. संभाषण कौशल्य विकसनासाठी विविध उपक्रमांची निर्मिती करून अंमलबजावणी करणे.
३. उपक्रमांच्या परिणामांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

म्हावशी हे सातारा जिल्हयातील पाटण तालुक्यातील कराड–चिपळूण रोडवर वसलेले गाव. या गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, म्हावशी या ठिकाणी इ. ४ थी च्या वर्गात अध्ययन करणाऱ्या २८ विद्यार्थ्यांसाठी संभाषण कौशल्य विकसनासाठी संशोधकाने पूर्व चाचणी घेतली. त्यासाठी शोधन पद्धती, नमुना निवड, संशोधन साधन निवड या पद्धतीचा वापर करून त्यावर आधारित निष्कर्षांचा अभ्यास करून वर्गामध्ये Story Reading, Story Listening, Dramatization, Language Games असे विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या इंग्रजी कौशल्याचा विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले.

**फलनिष्पत्ती**

या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शब्दसंपत्तीची वाढ झाली. विद्यार्थ्यांचे शब्दांचे उच्चार स्पष्ट व शुद्ध झाले. त्यांच्या आवाजात चढ–उतार जाणवू लागले. विषयाला अनुसरून विद्यार्थी संभाषण करू लागले.

या सर्वांचा फायदा शाळेचा पट वाढण्यासाठी झाला. परिपाठावेळी विद्यार्थी हावभावयुक्त Story सांगू लागले.

हे सर्व विद्यार्थ्यांचे पालक व अधिकारी यांच्या सहकार्यामुळे शक्य झाले. सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद.